वसई क्र.-२
१५११ | ८३ | ७७
२०२४



क्र.महसूल/क-१/टे-१/एनएपी-कोपरी/वसई/एसआर-२१६/२०१५
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक 29 JAN 2016

वाचले :-

१. श्री. प्रदिप रमाकांत कोंडकर व इतर ३, रा. लक्ष्मी छाया, विर सावरकर मार्ग, विरार पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांचा दिनांक १८/०६/२०१५ व ०१/१२/२०१५ रोजीचा अर्ज
२. वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र. VVCMC/TP/NA NOC/VP-५६५४/६७१/२०१५-१६ दिनांक २३/०६/२०१५
३. तहसिलदार वसई यांचेकडील पत्र क्र.मशा/कक्ष-१/टे-जमिनबाब/एसआर-२३४/१५ दिनांक ०५/१०/२०१५
४. अर्जदार यांनी सादर केलेले क्षतिपूर्ती बंधपत्र दिनांक ३०/११/२०१५

---

आदेश :-

ज्या अर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक १ अन्वये पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील मौजे कोपरी येथील स.नं./हि.नं १२१/४१ क्षेत्र ३००.०० चौ.मी. जागेचा औद्योगिक व रहिवास या बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्याची परवानगी मिळण्याबाबत अर्ज प्राप्त झालेला आहे.

आणि ज्या अर्थी उपोद्घातातील अनुक्रमांक २ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र.क्र.VVCMC/TP/NA NOC/VP-५६५४/६७१/२०१५-१६ दिनांक २३/०६/२०१५ अन्वये सुयोग्य नियोजनाचे दृष्टीकोणातून बिनशेती ना हरकत दाखला दिलेला आहे.

ज्या अर्थी, परवानगी मागितलेल्या व आज गा.न.नं. ७/१२ चे कब्जेदार सदरी असलेल्या व्यक्तींचे मालकी हक्क निर्विवाद असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते. सदर जमिनीस आदिवासी हस्तांतरण कायद्याच्या तरतूदी लागू होत नाहीत. त्याप्रमाणे जमीन ना.ज.क.धा. कायद्याचे तरतुदीनुसार अतिरिक्त घोषित झालेली नाही तसेच ना.ज.क.धा. कायद्याचे कलम १०(३) व १०(५) खालील तरतुदीनुसार कार्यवाही झालेली नाही असे अभिप्राय नमूद करुन उपोद्घातातील अनुक्रमांक ३ अन्वये तहसिलदार वसई यांनी अहवाल सादर केलेला आहे.

त्याअर्थी आता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे निहित करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी याद्वारे, १) श्री. प्रदिप रमाकांत कोंडकर २) श्री. महेश हरी पाटील ३) हिरेन भुपेंद्र शहा व ४) श्री. सुशान महेश पाटील यांना पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील मौजे कोपरी येथील स.नं./हि.नं १२१/४१ क्षेत्र ३००.०० चौ.मी. अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र [illegible] चौ.मी. जागेचा औद्योगिक व रहिवास या बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यासाठी पुढील शर्तीस अधीन राहून अनुज्ञा (परवानगी) देण्यांत येत आहे.

त्या शर्ती अशा:-

1. ही परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम त्याखालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यात आलेली आहे.
२. अनुज्ञाग्राही व्यक्तीने ( ग्रॅंटीने ) अशा जमीनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या आणि किंवा अन्य बांधकामाचा उपयोग उक्त जमीनीचा ज्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यांत परवानगी देण्यात आली असेल त्याच प्रयोजनार्थ केला पाहिजे. आणि त्याने अशी जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडून तसा अर्थाची आगाऊ लेखी परवानगी मिळविल्याशिवाय इतर कोणताही वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरुन जमिनीचा वापर ठरविण्यात येईल.
३. अशी परवानगी देणा-या प्राधिका-याकडून अशा भूखंडाची किंवा त्याचे जे कोणतेही उपभूखंड करण्याबाबत मंजूरी मिळाली असेल त्या उपभूखंडाची/उपविभागांची आणखी पोट विभागणी करता येणार नाही.
४. अनुज्ञाग्राही व्यक्तीने (अ) जिल्हाधिकारी व वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे समाधान होईल अशा रीतीने अशा जमिनीत रस्ते,गटारे वगैरे बांधून आणि (ब) भूमापन